In Short

मित्रावर विश्वास ठेवला अन् जीव गमावला

पिंपरी : अनेक लोकांकडून पैसे घेऊन मित्राला व्यवसायासाठी दिले. मात्र मित्राने पैसे परत न दिल्याने तसेच इतरांनी दिलेल्या पैशांसाठी तगादा लावल्याच्या नैराश्यातून एकाने गळफास घेऊन आत्महत्या केली. शुक्रवारी (दि. ५) सकाळी काळेवाडी येथे तापकीरनगर परिसरात ही घटना घडली असून आरोपी मित्रावर गुन्हा दाखल करण्यात आला. दौलतराम भानुदास वाघ (रा. काळेवाडी) असे आत्महत्या केलेल्याचे नाव आहे. याप्रकरणी दौलतराम यांच्या पत्नीने वाकड पोलीस ठाण्यात रविवारी (दि. ७) फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी संदीप भिकचंद बागमार (वय ४५ रा. थेरगाव) याला अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दौलतराम आणि आरोपी संदीप हे मागील सात वर्षांपासून मित्र होते. दौलतराम यांनी संदीप याला व्यवसायासाठी उसने आणि व्याजाने पैसे घेऊन दिले. मात्र संदीप याने ते पैसे दौलतराम यांना वेळेवर परत दिले नाहीत. दरम्यान, दौलतराम यांनी ज्यांच्याकडून पैसे घेतले होते, त्यांनी पैशांसाठी तगादा लावला. दरम्यान, संदीप याने दौलतराम यांच्यासोबत भांडण करून त्यांना मानसिक व आर्थिक त्रास दिला. त्यातून दौलतराम यांनी राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. वाकड पोलीस तपास करीत आहेत.

पूर्ववैमनस्यातून तरुणावर हत्याराने वार करणाऱ्यांवर गुन्हा

पुणे : सिंहगड रस्त्यावरील धायरी परिसरात पूर्ववैमनस्यातून तरुणावर तीक्ष्ण शस्त्राने वार करणाऱ्या सात-आठ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला. विराज अजय चितारे (वय २२, रा. आरोही कॉम्प्लेक्स, रायकरमळा, धायरी) असे जखमी झालेल्याचे नाव आहे. या प्रकरणी सराईत गुन्हेगार पप्या लोणारे, वैभव तरडे, महेश रोगे यांच्यासह आठ ते दहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत चितारे याने सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. लोणारे, तरडे सराईत असून त्यांच्याविरुद्ध खून, खुनाचा प्रयत्न, शस्त्र बाळगणे असे गंभीर गुन्हे दाखल आहेत. रायकरमळा परिसरातील मोकळ्या मैदानात चितारे, त्याचा मित्र विशाल कदिरे गप्पा मारत थांबले होते. त्या वेळी आरोपी लोणारे, तरडे आणि साथीदार तेथे आले. दोन महिन्यांपूर्वी चितारेचा मित्र जय दाभाडे याच्याशी आरोपींची भांडणे झाली होती. आरोपींनी चितारेला शिवीगाळ करून मारहाण केली. लोणारे, तरडे, रोगे यांनी चितारेवर तीक्ष्ण शस्त्राने वार केले. पसार झालेल्या आरोपींचा पोलिसांकडून शोध घेण्यात येत आहे.

मातृशक्ती, शौर्य रथांसह पुणेकरांनी काढली भव्य शोभायात्रा

हिंदू नववर्ष स्वागत समितीतर्फे गुढीपाडव्याला आयोजन | विविध रथांसह मर्दानी खेळ व ग्रामगुढीचा समावेश

पुणे : प्रतिनिधी

विविध क्षेत्रांत पद्मश्री पुरस्कार मिळविलेल्या महिलांच्या कार्याची महती सांगणारा मातृशक्ती रथ... छत्रपती शिवाजीमहाराजांचा भव्य अश्वारूढ पुतळा असलेला शौर्य रथासह भारत माता की जय... छत्रपती शिवाजी महाराज की जय...च्या घोषणा देत पारंपरिक वेशात सहभागी झालेले पुणेकर, अशा उत्साही वातावरणात शहराच्या मध्यभागात भव्य शोभायात्रा काढण्यात आली.

हिंदू नववर्ष स्वागत समितीतर्फे महात्मा फुले मंडईतील लोकमान्य टिळक पुतळा ते श्री तांबडी जोगेश्वरी मंदिर अशी शोभायात्रा आयोजित केली होती. या वेळी रा. स्व. संघाचे पुणे महानगर कार्यवाह सचिन भोसले, समितीचे संयोजक राघवेंद्र मानकर, सहसंयोजक अश्विन देवळणकर, माजी महापौर मुरलीधर मोहोळ, धीरज घाटे, हेमंत रासने, गायत्री खडके, कुणाल टिळक, नवनीत मित्र मंडळ अध्यक्ष संतोष फडतरे, भाऊ रंगारी मंडळाचे अध्यक्ष संजीव जावळे, अमित पळसकर, नीलेश खडके, महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे शेखर मुंदडा, सुनील देवधर उपस्थित होते.

महात्मा फुले मंडईतील लोकमान्य टिळक पुतळ्यापासून सकाळी शोभायात्रेला प्रारंभ झाला. प्रबोधन मंच रथ, भजनी मंडळ, मातृशक्ती रथ, छत्रपती शिवाजी महाराज रथ, बँड, मर्दानी खेळ, वेत्रचर्म पथक देखील सहभागी झाले होते. मतदानाचे महत्त्व पटवून देत मतदार जनजागृतीकरिता सहभागी झालेला विशेष रथ सर्वांचे लक्ष वेधून घेत होता.

पुणेकरांनी देखील भगव्या टोप्या, भगवे फेटे घालून, धर्मध्वज (भगवा) हातात घेऊन उत्साहाने सहभाग घेतला. लोकमान्य टिळक पुतळ्यापासून निघालेल्या शोभायात्रेचा समारोप तुळशीबाग राम मंदिर, शनिपार, अप्पा बळवंत चौक मार्गे तांबडी जोगेश्वरी मंदिर येथे झाला. या वेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या सरदारांच्या घराण्यातील अनिल जेधे, राजाभाऊ भिलारे, मारुती गोळे, रूपाली देशपांडे या वंशजांच्या हस्ते ग्रामगुढी देखील उभारण्यात आली.

अमोघ वैद्य यांनी सूत्रसंचालन केले. यात्रा प्रमुख म्हणून चैतन्य कुसुरकर, अथर्व दातार व अथर्व पाठक यांनी नियोजन केले.

यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात गुढी उभारण्याचे भाग्य

अभिनेते संकर्षण कऱ्हाडे यांची भावना

पुणे : यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात सांस्कृतिक गुढी उभारण्याचा मान आमच्या सारख्या कलाकारांना मिळतो, हे आमचे भाग्य आहे. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद कोथरूड शाखा गेली, अनेक वर्षे कलाकारांना मान देऊन खऱ्या कलाकारांना त्यांच्या क्षेत्रात ऊर्जा देण्याचे काम करीत आहे, अशी भावना सुप्रसिद्ध अभिनेते संकर्षण कऱ्हाडे व सुप्रसिद्ध अभिनेत्री स्पृहा यांनी या वेळी व्यक्त केली.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद कोथरूड शाखातर्फे आयोजित गुढीपाडव्याचे औचित्य साधून कलावंताच्या सांस्कृतिक गुढीचे आयोजन यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे केले होते.

संकर्षण कऱ्हाडे व स्पृहा जोशी यांच्या हस्ते गुढी उभारून पूजा करण्यात आली. या वेळी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद कोथरूड शाखेचे व संवाद पुणेचे अध्यक्ष सुनील महाजन, प्रमुख कार्यवाह सत्यजित धांडेकर, उपाध्यक्ष समीर हंपी, कोषाध्यक्ष दीपक गुप्ते, निर्माते चंद्रशेखर गोखले, रोहित शुक्ला, दिशा थोरात, गिरीश गोडबोले यांच्यासह कोथरूड नाट्य परिषदेचे पदाधिकारी, सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सुनील महाजन यांच्या एकसष्ठीनिमित्त त्यांचा ६१ गुलाबांचा बुके देऊन या वेळी सन्मान करण्यात आला. स्पृहा जोशी म्हणाल्या, नाट्य परिषद आता १०० वे वर्षे साजरे करीत आहे. कोथरूड शाखा विविध उपक्रम राबून कलाकरांना बळ देते. आज आमच्या हातून गुढी पूजन करण्यात आले, हे आमचे भाग्यच आहे, असे त्यांनी सांगितले.

सुनील महाजन म्हणाले, महाराष्ट्रात थिएटरमध्ये गुढी उभारण्याचे काम फक्त कोथरूडमध्येच होते. नाट्यगृह हेच आमचे घर मानून आम्ही दर वर्षी सांस्कृतिक गुढी उभारण्यात येते. यंदाचे हे १५ वे वर्ष आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाची सुरुवात राजेश्वरी पवार यांनी 'लाभले आम्हास भाग्य बोलतो' मराठी हे गीत सादर केले. दिशा हटकर यांनी गणेश वंदना व श्रद्धा गायकवाड यांनी 'आजी सोनियाचा दिवस' हे गीत सादर केले.

भरधाव वाहनाने पोलिसालाच उडवले

पिंपरी : प्रतिनिधी

भरधाव चारचाकी वाहनाने वाहतूक नियमन करत असलेल्या वाहतूक पोलिसाला उडवले. यामध्ये पोलीस कर्मचारी गंभीर जखमी झाले आहे. चऱ्होली येथे सोमवारी (दि. ८) दुपारी पावणे बाराच्या सुमारास ही घटना घडली. राहुल मोटे (वय ३०) असे गंभीर जखमी झालेल्या वाहतूक पोलिसाचे नाव आहे. प्रशांत कदम (वय २०) असे गुन्हा दाखल झालेल्या वाहन चालकाचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राहुल मोटे हे दिघी आळंदी वाहतूक विभागात नियुक्त आहेत. चऱ्होली गावातून अजिंक्य डी. वाय. पाटील महाविद्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावर वाहतूक पोलिस वाहतूक नियमन करत होते. यात एक पोलिस उपनिरीक्षक तसेच तीन अंमलदार होते.

दरम्यान, दुपारी पावणेबाराच्या सुमारास चऱ्होली गावाकडून एक चारचाकी वाहन भरधाव वेगात आले. या वाहनाला काळ्या काचा होत्या. त्यामुळे पोलिसांनी वाहन थांबवण्याचा प्रयत्न केला. मात्र चालकाने वाहन दामटले. त्यामुळे पोलिस अंमलदार राहुल मोटे यांनी पुढे होऊन वाहन चालकाला थांबण्याचा इशारा केला.

त्यावेळी चालकाने भरधाव चारचाकी राहुल मोटे यांच्या अंगावर घातली. यात राहुल गंभीर जखमी झाले. त्यांना पुणे येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. याप्रकरणी दिघी पोलिस ठाण्यात रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला.

प्रदूषणास कारणीभूत ठरणाऱ्या अकरा आरएमसी प्रकल्पांना नोटीस

पिंपरी पालिकेच्या पर्यावरण विभागाची कारवाई | हवा व ध्वनी प्रदूषणात होते वाढ

पिंपरी : प्रतिनिधी

विनापरवानगी रेडी मिक्स कॉंक्रिट अर्थात आरएमसी प्रकल्प शहरात सुरू आहेत. त्यामुळे हवा व ध्वनी प्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. त्यामुळे हे प्रकल्प तात्काळ बंद करण्याबाबत महापालिकेच्या पर्यावरण विभागाकडून अकरा आरएमसी प्रकल्पांना नोटिस देण्यात आली आहे. यामध्ये महापालिका हद्दीतील किवळे, ताथवडे, पुनावळे, मोशी परिसरातील प्रकल्पांचा समावेश आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेकडे किवळे, ताथवडे, पुनावळे आणि मोशी भागात सुरू असलेल्या गृहप्रकल्पांसाठी आरएमसी प्रकल्प चालविले जातात. परंतु, त्याबाबत नागरिकांच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या विनापरवाना सुरू असलेल्या हवा व ध्वनी प्रदूषणामुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊन श्वसनांचा त्रास सुरु झाला आहे. हे प्रकल्प बंद करावे किंवा इतरत्र हलविण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. धूळ हवेत जात असल्याने हवा अशुध्द होत आहे. त्यात 'आर एम सी प्लांट' हे रात्र-दिवस सुरु राहिल्याने ध्वनी प्रदुषणदेखील वाढले आहे.

आरएमसी प्लांट चालविणाऱ्यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून व्यवसाय चालवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या परवानग्या घेतल्या जात नाहीत. हा व्यवसाय ते अनधिकृतपणे चालवित असल्याचे पर्यावरण विभागाच्या निर्दशनास आले.त्यामुळे पालिकेने किवळे, ताथवडे, पुनावळे आणि मोशी परिसरातील अकरा आरएमसी प्रकल्प चालविणाऱ्यांना नोटीस बजाविली आहे. सदरचे प्लांट नोटीस मिळाल्यानंतर तात्काळ बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. शासनाकडील आवश्यक असणाऱ्या सर्व परवानग्या घेऊन पर्यावरणाची हानी होणार नाही. तसेच नागरिकांच्या तक्रारी महापालिकेकडे प्राप्त होणार नाहीत.

याबाबत योग्य ती खबरदारी घेऊन सदरचा प्लांट चालू करण्याची कार्यवाही करावी, तसेच नोटीस मिळाल्यानंतर सात दिवसात खुलासा करावा, अन्यथा महापालिका अधिनियम ३७६ अ अन्वये कडक कारवाई करण्यात येईल, असा इशाराही पर्यावरण विभागाने याव्दारे दिला आहे.

धुळीमुळे वाढणारे प्रदूषण ठरतेय धोक्याचे...

शहरात गृहप्रकल्पांची संख्या वाढली आहे. त्या प्रकल्पांना रेडी मिक्स कॉंक्रिट मटेरियल लागते. त्याकरिता पालिका हद्दीत आरएमसी प्रकल्प अनधिकृतपणे चालविले जात आहेत. दिवस-रात्र सुरु असलेल्या या प्रकल्पांमुळे निर्माण होणाऱ्या धुळीपासून शहरात वायू प्रदूषणात व ध्वनि प्रदूषणात वाढ झालेली आहे. ताथवडे, पुनावळे, किवळे आणि मोशी भागातील सोसायटीतील नागरिकांसाठी हे प्रदूषण धोक्याचे ठरत आहे.

"

महापालिका हद्दीत आवश्यक परवानगी न घेता आरएमसी प्रकल्प सुरू असल्याचे निदर्शनास आले होते. तेथील नागरिकांच्या तक्रारीनुसार पर्यावरण विभागाकडून घटनास्थळी जाऊन पाहणी करण्यात आली. त्यांच्याकडून शासनाची आवश्यक परवानगी घेतली गेलेली नाही. ही बाब देखील समोर आली. त्यामुळे अशा अकरा आरएमसी प्रकल्प चालकांना नोटीस बजाविण्यात आलेली आहे. ते बंद ठेवण्याचे आदेश दिले असून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला देखील याबाबत पत्रव्यवहार केला आहे.

संजय कुलकर्णी, सहशहर अभियंता, महापालिका पिंपरी चिंचवड

गर्भवती माता व बालकांच्या सुरक्षेसाठी 'किलकारी' योजना

- पालिका रुग्णालयात १ एप्रिलपासून सुरुवात
- २३२ गर्भवती महिलांची नोंदणी

पिंपरी : महाराष्ट्र शासनाने गर्भवती माता व बालकांच्या आरोग्याच्या सुरक्षिततेसाठी सुरू केलेल्या 'किलकारी' योजनेंतर्गत शहरातील २३२ गर्भवती महिलांनी नोंदणी केली आहे. या योजनेमध्ये नोंदणी केल्यानंतर गर्भवती महिलांना एसएमएस व व्हॉइस नोटद्वारे आरोग्य विषयक माहिती मिळणार आहे. एक एप्रिलपासून ही योजना सुरू केली आहे.

शहरी व ग्रामीण भागात राहणाऱ्या गर्भवती महिलांना आपल्या आरोग्याविषयी जागरूक करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाच्या वतीने ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेत नोंदणी करण्यासाठी गर्भवती मातेने जवळील सार्वजनिक आरोग्य केंद्रावर आरसीएच पोर्टलवर नोंदणी करणे गरजेचे आहे. या पोर्टलवर नोंदणी केलेल्या गर्भवतींना गर्भारपणातील घ्यायच्या काळजीपासून ते बाळंतपणातील काळजी, बाळाचे लसीकरण आरोग्य विषयक माहिती महिलांना मिळणार आहे. नोंदणीकृत महिलांना शासनाच्या विविध योजनांचा लाभही घेता येणार आहे. सर्वसामान्य व गरीब वर्गातील गर्भवती व जन्मलेल्या बालकांचे आरोग्य चांगले रहावे, या हेतूने ही योजना सुरू केलेली आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिका आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे म्हणाले की, पालिकेचे दवाखाने व रुग्णालयांमध्ये किलकारीसाठी गर्भवती महिलांची नोंदणी सुरू करण्यात आली आहे. त्यामाध्यमातून त्यांना कशी काळजी घ्यायची व आवश्यक औषधोपचार याबाबत माहिती व मार्गदर्शन दिले जाणार आहे. गर्भवती माता व बालकांच्या आरोग्यासाठी योजना महत्त्वाची ठरणार आहे.

जाहीर हरकत

आमचे अशिल यांनी सांगितलेवरून व दिलेले माहितीवरून तमाम लोकांस या जाहीर हरकतीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात **ॲड. हेमा पांडुरंग शिंदे,** बी- लॉयर्स चेंबर नं. १६, जिल्हा न्यायालय आवार, सोलापूर- ४१३००३. मोबाईल - ८८३०८०४००१ यांचे तर्फे त्यांचे अशिल यांनी परिशिष्टामध्ये नमूद मिळकतीचे बाबत व्यवहार करीत असल्याची दि. ०७/०४/२०२४ रोजीचे दैनिक प्रभात मध्ये प्रसिध्द केलेल्या जाहीर नोटीसीस **आमचे अशिल श्री. श्री. ज्ञानेश्वर भिकु उर्फ भिकोबा जगताप व इतर** रा. वानवडी, पुणे यांची तीव्र हरकत आहे. परिशिष्टामध्ये नमूद मिळकत ही आमचे अशिलांचे वडीलोपार्जित मालकी हक्काची मिळकत आहे. असे असतानाही सदर मिळकत तुमचे अशिल हस्तांतरण/खरेदी व्यवहार करणार असलेचे बाबत जाहीर नोटीस प्रसिध्द केलेली आहे. सदर प्रसिध्द केलेल्या दि. ०७/०४/२०२४ रोजीच्या जाहीर नोटिसीस आमचे अशिल जाहीररित्या सक्त हरकत घेत आहेत. सदरची मिळकत विक्री, हस्तांतर करण्याचा कोणताही कायदेशीर हक्क व अधिकार संबंधितास नाहीत. तसेच जाहीर नोटिसीमध्ये चुकीच्या चतु:सीमा नमूद केलेल्या आहेत व आमच्या अशिलांना शारीरिक, मानसिक व आर्थिक त्रास देण्याच्या हेतूने संबंधितांनी व्यवहार करण्याचा प्रयत्न करीत आहेत. तरी सदर मिळकतीबाबत कोणीही कसल्याही प्रकारचा खरेदी विक्रीचा अथवा इतर कोणताही व्यवहार कोणाशीही करू नये. याउपरही आमचे अशिलांची सदरची हरकत डावलून सदर मिळकतीबाबत तुम्ही अथवा अन्य कोणीही कोणत्याही स्वरूपाचा व्यवहार केल्यास तो बेकायदशीर होईल. तसेच त्याबाबत आमचे अशिल योग्य ती कायदेशीर कारवाई करतील व त्याचे होणारे खर्चास व परिणामास तुम्हीच सर्वस्वी जबाबदार रहाल. याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

ए. जिल्हा तुकडी पुणे, पोटतुकडी हवेली, मे. दुय्यम निबंधक साहेब, हवेली ता. पंचायत समिती हवेली तसेच पुणे महानगरपालिका यांचे हद्दीतील गाव मौजे वानवडी ता. हवेली जि. पुणे येथील भूमापन/स.नं. ६४/१ ते ३२ यांसी पोटखराब्यासह एकूण क्षेत्र २० हे. ९४ आर मधील वादी यांचा सर्व्हे नं. ६४/२८ मधील क्षेत्र ०१ हे. ०२ आर.

बी. जिल्हा तुकडी पुणे, पोटतुकडी हवेली, मे. दुय्यम निबंधक साहेब, हवेली ता. पंचायत समिती हवेली तसेच पुणे महानगरपालिका यांचे हद्दीतील गाव मौजे वानवडी ता. हवेली जि. पुणे येथील भूमापन/स.नं. ६४/१ ते ३२ यांसी पोटखराब्यासह एकूण क्षेत्र २० हे. ९४ आर मधील वादी यांचा सर्व्हे नं. ६४/३१ मधील पोख सह क्षेत्र ०१ हे. ६४ आर. अशी कलम ए व बी मध्ये नमुद एकुण मिळकत २ हेक्टर ६६ आर इतके क्षेत्र प्रस्तुत हरकतीचा विषय असे. **सही/-**

दि. ०९/०४/२०२४

ॲड. संतोष लक्ष्मण जाधव

पत्ता : मंत्री अव्हेन्यु - २, पंचवटी, पाषाण रस्ता, पुणे - ४११००८. **मोबा. नं. ९५७९९५०००२**

जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, तुकडी, पुणे, पोट तुकडी; तालुका बारामती, पुणे जिल्हा परिषदेच्या हद्दीतील मौजे; काळखैरेवाडी येथील गट नंबर 383 यांसी क्षेत्र 00 हेक्टर 39 आर पैकी क्षेत्र 00 हेक्टर 20 आर (सदर मिळकत) वर बांधण्यात येणाऱ्या पेट्रोल पंपासंदर्भात ही नोटीस देण्यात येत आहे. सदर मिळकतीचे हक्क व अधिकार सौ. अनिता सुनील खरात यांनी 20 वर्षे कालावधीकरिता नोंदणीकृत भाडेपट्ट्याने प्राप्त केलेले आहेत. सदर मिळकत ही आज मितीस श्री. सुनील माणिकराव बांदल आणि श्री. किरण माणिकराव बांदल यांच्या नावावर आहे. जमीन मालक आणि भाडेपट्टेदार, उभयतांनी ती संपूर्णपणे निर्वेध, निजोंखमी व बोजारहित असल्याची, तसेच ती मिळकत कोणत्याही कोर्टात वादाचा विषय नसून, त्यावर जप्ती अगर मनाईचा हुकूम नाही, अशी खात्री व भरवसा आमचे अशिलांना दिला आहे, तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, लीज, लीन, बक्षीस, ताबा, पोटगी, दावा, कूळ, खंड, साठेखत, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, अधिकार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून 7 दिवसांच्या आत आमच्याकडे समक्ष येऊन मूळ कागदपत्रांनिशी त्याबाबत आमची खात्री पटवून द्यावी. येणेप्रमाणे मुदतीत कागदपत्रांनिशी आक्षेप न आल्यास सदर मिळकतीवर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, अधिकार नाही व असल्यास त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिला आहे, असे समजण्यास येईल व व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही.

पुणे दिनांक : 09/04/2024

स्वाक्षरित/-

श्री. भूषण मु. शालुकर

बी.एस.एल. एल.एल. एम. **(वकील)**

ऑफिस; ३, 'श्रीनिवास आदित्य', प्लॉट नं. २५, मनिषा सोसायटी, कर्वेनगर, पुणे-४११०५२

फोन ०२०-२५४६३२०३

मोबाईल : ९४२२०२५२०३, ९८५००३५२०३

bhushanshalukar@gmail.com

ICICI Home Finance | **कॉर्पोरेट कार्यालय :** आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, आयसीआयसीआय एचएफसी टॉवर, अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०५९, भारत.

शाखा कार्यालय : कार्यालय नं. १०१, पहिला मजला, फॉर्च्युन बिझनेस सेंटर, ॲम्बियन्स हॉटेलजवळ, कस्पटे वस्ती, वाकड, पुणे-४११ ०५७.

(नियम ८ (६) च्या तरतुदी पाहा)

अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी सूचना

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, २००२ तसेच त्यासह वाचा सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ८ (६) अंतर्गत तरतुदींच्या अनुसार अचल मालमत्तांच्या ई-लिलाव विक्रीकरिता सूचना.

याद्वारे आम जनतेला आणि विशेषतः कर्जदार व हमीदार यांना सूचित करण्यात येते की, खालीलप्रमाणे नमूद केलेल्या मालमत्ता या संरक्षित धनको यांच्याकडे तारण ठेवण्यात आल्या आहेत, तसेच त्यांच्यावर धनको यांचा भार आहे आणि त्यांचा **प्रत्यक्ष ताबा** आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड यांच्या प्राधिकृत अधिकारी यांनी घेतला आहे आणि त्यांची विक्री ''जसे आहे जिथे आहे'', ''जसे आहे जे आहे'' तत्त्वानुसार आणि खालीलप्रमाणे देण्यात आलेल्या तपशिलाच्या अनुसार करण्यात येणार आहे.

अ. क्र.	कर्जदार/सहकर्जदार/ हमीदार/कायदेशीर वारसदार यांचे नाव आणि कर्ज खाते क्रमांक	संरक्षित मालमत्तेचा तपशील त्यावर असलेल्या भारांसह असल्यास	येणे असलेली रक्कम	राखीव किंमत / इसारा रक्कम ठेव	मालमत्तेच्या पाहणीची तारीख आणि वेळ	लिलावाची तारीख आणि वेळ
(ए)	(बी)	(सी)	(डी)	(ई)	(एफ)	(जी)
१	नीलेश दिलीप कोंढारे (कर्जदार), स्वाती नीलेश कोंढारे (सहकर्जदार), कर्ज खाते क्र. : एलएचपीडब्ल्यूके ००००१३५४३३४ व एलएचपीडब्ल्यूके ००००१३५४३३३	फ्लॅट क्र. ३०१, तिसरा मजला, ''स्प्रिंग रेसिडेन्सी'' स्कीममधील, प्लॉट क्र. ६३, जुना सर्व्हे क्र. ८/१ व नवीन गट क्र. ४६१ व ४६२, मौजे गाव कदमवाकवस्ती, उपनिबंधक, पुणे यांच्या हद्दीतील व जिल्हा परिषद समिती, तालुका हवेली, जि. पुणे यांच्या हद्दीतील.	रु. ५८,९६,८८४/- दि. ०४ एप्रिल २०२४	रु. ३६,००,६७७/- / रु. ३,६०,०७०/-	१५ एप्रिल २०२४ रोजी स. ११.०० ते दु. ३.००	२६ एप्रिल २०२४ रोजी दु. २.०० ते दु. ३.००
२	दौलतराव श्रीपती भोसले (कर्जदार) कर्ज खाते क्र. एलएचपीयून ००००१२८३२५३	फ्लॅट क्र. ए-१००४, दहावा मजला, इमारत क्र. ''ए'', गट क्र. ७५१, गाव लोणीकंद, तालुका हवेली, जिल्हा पुणे, उपनिबंधक हवेली क्र. १ ते २३ यांच्या कार्यकक्षेतील व जिल्हा परिषद पुणे यांच्या हद्दीतील.	रु. २४,८४,५५८/- दि. ०४ एप्रिल २०२४	रु. १८,०५,००४/- / रु. १,८०,५१०/-	१५ एप्रिल २०२४ रोजी स. ११.०० ते दु. ३.००	२६ एप्रिल २०२४ रोजी दु. २.०० ते दु. ३.००
३	बालाजी सटवा गाडे (कर्जदार), सुवर्णा बालाजी गाडे (सहकर्जदार), कर्ज खाते क्र. एलएचपीयून ००००१२९७३१६	अपार्टमेंट क्र. १०४, पहिला मजला, ''सारा सिटी'' नावाने ज्ञात इमारतीतील, ''सी'' बिल्डिंग नं. सी ८, सी ९, सी १० व सी ११ फेज १ म्हणून ज्ञात, प्लॉट क्र. सी धारक जमिनीच्या सर्व त्या भाग व भूखंडावरील, गट क्र. १३७, १३८, १३९, १४०, १४१, १४२, १४३, १४४, १४५, १५०, १५२, १५३, १५४, १५५, १५६ व १५७ पैकी, मौजे खराबवाडी, पुणे, नोंदणीकरण उपजिल्हा तालुका खेड, जि. पुणे येथील व पीएमआरडीए यांच्या हद्दीतील.	रु. ८,०५,४८१/- दि. ४ एप्रिल २०२४	रु. ६,७७,५८७/- / रु. ६७,७६०/-	१५ एप्रिल २०२४ रोजी स. ११.०० ते दु. ३.००	२६ एप्रिल २०२४ रोजी दु. २.०० ते दु. ३.००
४	भांड प्रवीणकुमार (कर्जदार), साधना प्रवीणकुमार भांड (सहकर्जदार) कर्ज खाते क्र. एलएचबीएम टी ००००१४७६२५४	प्लॉट क्र. बी ५, सर्व्हे क्र. ५६/२/ए पैकी व सर्व्हे क्र. ५६/२/ए/बी/५ पैकी, ''लक्ष्मी पार्क'' नावाने ज्ञात प्रकल्पापैकी, गाव गोपाळवाडी, ता. दौंड, जि. पुणे, ''लक्ष्मी पार्क'' गोपाळवाडी, तालुका दौंड, जि. पुणे, सर्व्हे क्र. ५६ २ए, दौंड, महाराष्ट्र-४१३ ८०१.	रु. १३,४४,०१९/- दि. ४ एप्रिल २०२४	रु. १३,०९,९३२/- / रु. १,३१,०००/-	१५ एप्रिल २०२४ रोजी स. ११.०० ते दु. ३.००	२६ एप्रिल २०२४ रोजी दु. २.०० ते दु. ३.००
५	अश्विन पांडू गोकुळ (कर्जदार), महालक्ष्मी पांडू गोकुळ (सहकर्जदार), कर्ज खाते क्र. एलएचपीयून ००००१२९९४२४	फ्लॅट क्र. बी ०२, तळमजला, इमारतीचे नाव ''श्री राम अपार्टमेंट'', ''ए'' बिल्डिंग, ''बी विंग'', सर्व्हे क्र. नवीन २/३बी/१ जुना १६८, गोपाळवाडी मधील, दौंड महानगरपालिका हद्दीतील, जि. पुणे, उपनिबंधक, दौंड यांच्या हद्दीतील.	रु. १८,७६,१८९/- दि. ०४ एप्रिल २०२४	रु. १२,४०,३८३/- / रु. १,२४,०४०/-	१५ एप्रिल २०२४ रोजी स. ११.०० ते दु. ३.००	२६ एप्रिल २०२४ रोजी दु. २.०० ते दु. ३.००

ऑनलाइन लिलाव प्रक्रिया ही आमची लिलाव एजन्सी **ग्लोब टेक** यांचे संकेतस्थळ (**यूआरएल लिंक** - https://BestAuctionDeal.com) यांच्या माध्यमातून घेण्यात येईल. तारणदार/सूचना देण्यात येत आहे की, त्यांनी एकूण येणे असलेली रक्कम अधिक त्यावरील व्याज आणि अन्य शुल्क दिनांक **२५ एप्रिल २०२४ रोजी संध्याकाळी ०५.०० पर्यंत** अदा करावे. संरक्षित मालमत्तांची विक्री वरीलप्रमाणे नमूद केलेल्या वेळापत्रकाच्या अनुसार करण्यात येणार आहे.

प्रस्तावित बोलीदार यांनी ईएमडी रक्कम आरटीजीएस/डीडी यांच्या माध्यमातून (रकाना ई चा संदर्भ घ्यावा) **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, कार्यालय क्र. १०१, पहिला मजला, फॉर्च्युन बिझनेस सेंटर, ॲम्बियन्स हॉटेलजवळ, कस्पटे वस्ती, वाकड, पुणे-४११ ०५७** येथे **दि. २५ एप्रिल २०२४ रोजी संध्याकाळी ४.०० वाजेपर्यंत** किंवा त्यापूर्वी अदा करावी. कृपया नोंद घ्यावी की, प्रस्तावित बोलीदार वरीलप्रमाणे नमूद केलेल्या वेळापत्रकाच्या अनुसार आणि वेळेत आपली बोली सादर करू शकणार नसतील तर निविदा प्रपत्र **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, कार्यालय क्र. १०१, पहिला मजला, फॉर्च्युन बिझनेस सेंटर, ॲम्बियन्स हॉटेलजवळ, कस्पटे वस्ती, वाकड, पुणे-४११ ०५७** येथे **दि. २५ एप्रिल २०२४ रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत** किंवा त्यापूर्वी सादर करता येईल. ईएमडी रकमेच्या संदर्भात डीडी हा राष्ट्रीयीकृत बँकेचा/शेड्युल्ड बँकेचा आणि ''**आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड- लिलाव**'' यांच्या नावे आणि **पुणे** येथे देय असावा.

वरीलप्रमाणे नमूद केलेल्या संरक्षित मालमत्तांच्या संदर्भात पाहणी करण्यासाठी यापुढील अधिक स्पष्टीकरणासाठी तसेच लिलावाच्या संदर्भात अटी आणि शर्ती यांची माहिती जाणून घेण्यासाठी आणि निविदा सादर करण्याच्या संदर्भातील अधिक माहिती जाणून घेण्यासाठी कृपया **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड-९९२०८०७३०० किंवा आमचे विक्री आणि विपणन भागीदार नेक्सझेन सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड** यांच्याशी संपर्क साधावा.

कोणतीही किंवा सर्व बोली कोणतेही कारण न देता फेटाळून लावण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. विक्रीच्या संदर्भातील सविस्तर अटी आणि शर्ती जाणून घेण्यासाठी कृपया https://www.icicihfc.com/ येथे भेट द्यावी.

दिनांक : १० एप्रिल २०२४

स्थळ : पुणे

प्राधिकृत अधिकारी

**आयसीआयस